# पाणी काढतांना गेला तोल; विहिरीत पडून मृत्यू

## तुमसर तालुक्यातील रुपेरा येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा, ता. ११:** विहिरीतून पाणी काढत असतांना अचानक तोल गेल्याने विहिरीत पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना तुमसर तालुक्यातील रुपेरा येथे दि. १० मे रोजी दुपारी ३.३० वाजतादरम्यान घडली. मंगेश हिवराज मरस्कोल्हे (३९) रा. रुपेरा, असे मृतकाचे नाव आहे.

रुपेरा येथील मंगेश मरस्कोल्हे हा आपल्या आई-वडिलांसोबत राहत होता. दि. १० मे रोजी दुपारी रोजच्या प्रमाणे घरामागील शेतात असलेल्या विहिरीचा घरगुती वापराकरीता पाणी भरत होता.

विहिरीतून पाणी काढत असतांना अचानक त्याचा विहिरीत तोल गेल्याने विहिरीत पडला. घटना उघडकीस येताच गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत मंगेश याला विहिरीतून बाहेर काढले.

तोपर्यंत त्याला मृत्यू झाला होता. घटनेची माहिती सिहोरा पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठून घटनेचा पंचनामा केला व प्रेत शवविच्छेदनाकरीता पाठविण्यात आले.

सदर घटनेची नोंद सिहोरा पोलिसात केली असून पुढील तपास पोहवा गयगये करीत आहेत.

# अलर्ट रहा...
# जिल्हाधिकाऱ्यांचे यंत्रणांना निर्देश

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आपत्कालीन यंत्रणांचा आढावा



**महासागर जिल्हाप्रतिनिधी**

**भंडारा , दि.१२ मे :** कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास गृह विभाग, आरोग्य यंत्रणा यासह अन्य महत्त्वाच्या सर्व यंत्रणांनी दक्ष राहण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.संजय कोलते यांनी आज दिले.

सुरक्षेच्या उपायोजना तसेच आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी यंत्रणांची पूर्वतयारी बाबत ही बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालय आयोजित करण्यात आली होती यावेळी जिल्हाधिकारी संजय कोलते, प्रभारी पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे आरोग्य यंत्रणा व सार्वजनिक बांधकाम विभागासह अन्य महत्वाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अभिषेक नामदास यांनी सादरीकरण सादर करून यंत्रणांच्या जबाबदारी आणि भूमिकेची मांडणी केली.

अतिरिक्त शल्य चिकित्सक, पोलीस निरीक्षक वाहतूक, दहशतवाद विरोधी पथक, मुख्याधिकारी नगरपरिषद भंडारा या सर्व यंत्रणांनी कार्यवाही यंत्रणा म्हणून काम करताना समन्वय, संपर्क, आणि सजगता या तीन सूत्रावर काम करावे असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

सर्व यंत्रणांनी त्यांच्याकडील असलेली साधनसामग्री तपासून ती जास्तीत जास्त अद्यावत करावी. यंत्रणेच्या सुसज्यतेमध्ये असणाऱ्या त्रुटी दुर कराव्यात प्रामुख्याने साधनसामग्रीची अनुपलब्धता किंवा ती दुरुस्त नसणे हे लक्षात घेता तातडीने अँम्बुलन्स ,फायर ब्रिगेड मशनरी ,ह्या मशिनरींची सुसज्जता सर्व आस्थापनांनी तपासून घ्यावी. तसेच उपविभागीय अधिकारी महसूल, पोलीस अधीक्षक भंडारा व आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी संभाव्य आपत्तीशी तोंड देण्यासाठी आवश्यक असणारे नियोजन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावे.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये वाहतुकीसाठी तहसीलदार भंडारा, जिल्हा पुरवठा अधिकारी, बीएसएनएलची यंत्रणा ,पाटबंधारे विभाग, शल्यचिकित्सक, आरोग्य अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी देखील वाहनांची सुसज्जता वाहनांची उपलब्धता याबाबत आपल्या अधिनस्त यंत्रणेकडून आढावा घेऊन तसा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना द्यावा.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये माध्यमांशी व संपर्कासाठी जिल्हा माहिती अधिकारी काम पाहतील. पोलीस अधीक्षकांनी पोलीसातील सर्व विभागासमवेत समन्वय करणे व त्यांना आवश्यक ते निर्देश देणे तसेच आवश्यकतेनुसार सर्व आदेश निर्गमित करण्याचे सूचित करण्यात आले.

प्रशासनातील सर्व विभागाशी समन्वय करणे व त्यांना आवश्यक दिशा निर्देश देण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी कार्यरत राहतील. आपत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने प्रशासनाची भूमिका प्रसार माध्यमांसमोर मांडणी अनुषंगाने खंडन व उच्च प्रसारित करणे या बाबींसाठी जिल्हा माहिती अधिकारी कार्यरत राहतील.

आपत्कालीन परिस्थिती संसाधने, यंत्र साहित्य ,वाहने ,अन्नसामग्री मनुष्यबळ यासाठीची तातडीची निकड लक्षात घेता, सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याची निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले .

# लाखांदूर तालुक्यातील अर्धवट कॅनल चे काम त्वरित पूर्ण होणार

## आ. परिणय फुके यांचे अधिकाऱ्यांना निर्देश...



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा , दि.१२ मे :** गोसेखुर्द धरण प्रकल्पामुळे बाधित झालेल्या नागरिकांच्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या समस्या सोडवण्यासाठी आमदार डॉ. परिणय फुके यांनी पुढाकार घेतला आहे. नागपूर येथील सिंचन भवनात त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत पुनर्वसन, कालवा कामे, उपसा सिंचन योजना आणि संपादन विषयक अनेक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.

भंडारा तालुक्यातील खैरी व संगम या गावांतील शेतकऱ्यांची शेती गोसे धरणात गेल्यामुळे ते नुकसान भरपाईपासून वंचित आहेत. या बाबतीत तात्काळ तोडगा काढण्याची गरज असल्याचे आमदार फुके यांनी स्पष्ट केले. मोहाडी तालुक्यातील मुंढरी गावाचे पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणीही बैठकीत मांडण्यात आली. भोजापूर येथील अपूर्वा कॉलनीत बॅक वॉटरमुळे काही घरे धोकादायक स्थितीत आली असून ती संपादित करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. लाखांदूर तालुक्यातील ओपरा, राजनी, डांबेवीरली, गवराळा, मोहरणा, कुडेगाव, विरली/खुर्द या गावांमध्ये डाव्या कालव्याचे काम अर्धवट राहिल्यामुळे शेती पाण्यात गेली आहे व मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मागील वर्षी कॅनल च्या अपूर्ण कामामुळे संपूर्ण गावामध्ये पाणी गेल्याने बरेच घरे पाण्यात बुडाली होती, तर बरीच शेती डुबलेली असल्याने शेतकऱ्यांचे बरेच नुकसान झाले.त्यामुळे कालव्या चे अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश आमदार फुके यांनी अधीकाऱ्यांना दिले.

पिपरी, चिचोली, लोहारा (मौदा तालुका), भंडारा व मोहाडी तालुक्यातील एकूण ७० गावांसाठी कन्हान नदीवरील गोसे प्रकल्पाच्या थांबलेल्या पाण्यावरून उपसा सिंचन योजना राबवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. यामुळे या गावांमध्ये शेतीला पाणी मिळू शकेल. तसेच मुख्य कालव्यालगतच्या आथली, आसोला, परसोडी (नाग), कुडेगाव, खैरी (पट), गवराळा, मांदेड, सावरगाव आदी गावांमध्ये लहान पाटचऱ्यांचे काम पूर्ण करावे, अशी सूचना झाली.

गोसे प्रकल्पातील गट क्रमांक २०५/३ मधील ९२८.३१ चौ. मीटर आणि गट क्रमांक २४१ मधील अकृषिक जमिनी संपादित करण्याचे प्रस्तावही शासनाकडे आहेत.

या प्रस्तावांना लवकरच मंजुरी देण्यात येईल, असे आश्वासन आमदार फुके यांनी दिले.

लाखांदूर तालुक्यातील ओपारा बागडी व इतर गावांमध्ये कॅनलची अपूर्ण काम असल्याने धारगाव उपसा सिंचन योजनेच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी देऊन भंडारा जिल्ह्यातील ४९ गावांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी बैठकीत झाली.

या बैठकीला व्हीआयडीसीचे कार्यकारी संचालक श्री. सोनटक्के, गोसेखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता आर. जी. पाटील, अंबाडी विभागाचे अधीक्षक अभियंता विश्वकर्मी, डावा कालवा विभागाचे कार्यकारी अभियंता सुहास मोरे, नेरला उपसा सिंचन योजनेचे कार्यकारी अभियंता अंकुश कापसे, गोसे विभागाचे कार्यकारी अभियंता जितेंद्र तुरखेडे, गोसे धरण विभागाचे कार्यकारी अभियंता ढुमने यांच्यासह प्रकल्पग्रस्त भागातील अनेक नागरिक व स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. मात्र, आमदार डॉ. परिणय फुके यांच्या पुढाकारामुळे या समस्या मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# भंडारा येथील दादाजी वृद्धाश्रमात ७५ वा वाढदिवस साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा , दि.१२ मे :** भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठ नागरिकांना आदराचे स्थान आहे. ज्येष्ठ्यांच्या हिताची काळजी घेणेकरिता भंडारा जिल्हा पोलीस दलामार्फत चालविल्या जाणाऱ्या भरोसा सेल मधील ज्येष्ठ नागरिक कक्ष हे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या आणि तक्रारिंचे निवारण करते. त्यांना आवश्यक माहिती आणि मार्गदर्शन पुरवते व त्यांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी प्रयत्न करते. ज्येष्ठ नागरिकांना सरकारी योजना, सुविधा आणि विविध विषयाबद्दल माहिती व मार्गदर्शन केले जाते ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना आणि त्यांना आवश्यक सहाय्य पुरविले जाते.

ज्येष्ठ नागरिक कक्ष हे सन्माननीय पोलीस अधीक्षक नूरूल हसन सर, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे सर, पोलीस उप अधीक्षक (गृह )उल्हास भुसारी सर तसेच भरोसा सेल च्या सुचिता शिंगाडे मॅडम यांच्या मार्गदर्शनात हे कक्ष कार्य करते. यांच्याच मार्गदर्शनात नुकताच दादाजी वृद्धाश्रमातील एक वृद्ध महिला पार्वता घोडके यांचा ७५ वा वाढदिवस ज्येष्ठ नागरिक कक्षामार्फत साजरा करण्यात आला.

यामध्ये वृद्धाश्रमातील २५ ते ३० ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. येथे त्यांच्या समस्यांचा आढावा घेण्यात आला व ज्येष्ठ नागरिक अधिकार व विविध शासकीय योजनांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

# नानाभाऊ पटोले यांच्या नेतृत्वातील काँग्रेस प्रणित परिवर्तन शेतकरी सहकार पॅनलचा दणदणीत विजय



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि.१२ मे :** साकोली तालुका सहकारी शेती खरेदी विक्री समिती मर्यादित लाखनीच्या संचालक मंडळाची निवडणूक रविवारी संपन्न झाली. या निवडणुकीत नानाभाऊ पटोले यांच्या नेतृत्वातील काँग्रेस प्रणित परिवर्तन शेतकरी सहकार पॅनलचे १२ उमेदवार निवडून आले. त्यात सर्वश्री जगन्नाथ कापसे ,मार्कंड भेंडारकर, ईश्वरदत्त गिरेपुंजे, जयकृष्ण फेंडरकर, खेमराज समरीत, नरेंद्र झलके, सौ. अश्विनी भिवगडे, सौ. अनिता बोरकर, सचिन बागडे, नामदेव राऊत, महादेव गायधनी, विजय कापसे संचालक म्हणून निवडून आले. लाखनी व साकोली तालुका काँग्रेस कमिटी तर्फे विजयी उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

## अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास २० मे २०२५ पर्यत मुदतवाढ

**भंडारा :** अनुसूचित जाती , नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशामध्ये विशेष अध्ययन करण्यासाठी प्रवेश घेतलेल्या सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांच्या शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर विस्तृत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्तीसाठी जाहिरातीद्वारे अर्ज स्विकारण्याची या-पूर्वी अंतिम मुदत ३० एप्रिल २०२५ दिली होती. त्याअनुषंगाने या जाहिरातीस आता अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदतवाढ २० मे २०२५ दिली आहे. तरी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जाती, नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी परदेश शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अर्ज तात्काळ आयुक्त, समाज कल्याण आायुक्तालय, ३, चर्चपथ, पुणे-०१ याचेस्तरावर अर्ज करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त सचिन मडावी यांनी केले आहे.

# तुमसर येथे ज्ञानदान बाल संस्कार शिबीराचे आयोजन

**तुमसर , दि.१२ मे :** येथील श्री संत ज्ञानेश्वर मंदिर, शिव नगर, तुमसर येथे.१३ मे ते १ जून पर्यंत दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी पण श्री ज्ञानेश्वर मंदीर समिती च्या वतीने ज्ञानदान बाल संस्कार शिबीर बैकुंठ वाशी ह.भ.प. श्री नारायणराव चुथा सांधारे व बैकुंठवासी ह.भ.प.अन्नाजी गुरुजी ह्यांच्या कृपा प्रसादाने बैकुंठवासी ह.भ.प. गुरुजी रत्नाकरजी महाराज श्री संत ज्ञानेश्वर आश्रम भंडारा ह्यांच्या प्रेरणास्थाने ह.भ.प. गौरीशंकर महाराज व ह.भ.प. गॉधुळे महाराज, ह.भ.प. नत्थूजी हाखडे महाराज, ह.भ.प. नारायण हिंगणे अलम्पूर ह.भ.प. प्रल्हादजी धोरण महाराज ह्याच्या मार्गदर्शनाखाली माऊलीच्या कृपेने ज्ञानदान बाल संस्कार शिबीराचे वि. १३/ ०५/ २०२५ रोज मंगलवार ते दि. १/०६/२०२५ रोज रविवार पर्यंत आयोजन करण्यात आलेला आहे .

१) विद्यार्थी १२ ते १८ वर्षांच्या वयोगटातील असावा. २)प्रत्येक विद्यार्थ्यांनी सोबत ताट, ग्लास, लोटा, चादर, पांढरा कुर्ता, पायजामा (धोतर), टोपी, उपरणा इ. आणावे. ३) विद्यार्थ्यांना मध्यंतरी (२१) दिवसाच्या कालावधीन) शिबिर सोडून बाहेर जाण्याची परवानगी राहणार नाही .४) विद्यार्थ्यांना भेटण्याची वेळ सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ४ ते ६ पर्यंत राहील, पालकांनी पाल्याजवळ पैसे देवू नये.५) जुन्या विद्यार्थ्यांनी सोबत गिता आणि हरिपाठ थी पुस्तक आगावी, तसेच हरिपाठ पाठांतर असणे आवश्यक आहे. ६)येणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या सोबत नोटबुक व पेन आणावे, विद्यार्थी जवळ मोबाईल देऊ नये. ह्या अटींचे पालन करावे लागेल शिबिरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना तरी इच्छुक विद्यार्थांनी संत ज्ञानेश्वर मंदिर शिव नगर, तुमसर येथे संपर्क ९४२०६१८७३७ करण्याचे आव्हान मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# ग्रीनफ्रेंडस तर्फे जखमी रानमांजर व चट्टेरी वनघुबडाला उपचारानंतर निसर्गात मुक्त

## निसर्गमित्रांची स्पृहणीय कामगिरी





**महासागर प्रतिनिधी**

**लाखनी , दि.१२ मे :** येथील ग्रीनफ्रेंडस नेचर क्लब तर्फे मागील वीस वर्षापासून कोणतेही शासकीय अनुदान न घेता भंडारा गोंदिया जिल्ह्यात अनेक पर्यावरण उपक्रम आखून समाजात विद्यार्थी व नागरिकात जागृती करीत आहेत तसेच मागील २० वर्षात शेकडो जखमी वन्यजीव ,पक्षी , विषारी बिनविषारी साप यांना वाचविण्याचे अखंड कार्य वनविभागाच्या सहाय्याने सातत्याने करीत आहेत.

याच उपक्रमांतर्गत नुकेतच लाखनी मध्ये एका जखमी रानमांजर तसेच चट्टेरी वनघुबड पक्ष्याला वाचविण्याचे महान कार्य ग्रीनफ्रेंडसच्या निसर्गमित्रांनी केले.

याबद्दल अधिक माहिती देताना ग्रीनफ्रेंडस नेचर क्लबचे कार्यवाह व लाखनी नगरपंचायतचे पर्यावरण दूत प्रा.अशोक गायधने यांनी सांगितले की ४ मे ला रात्री ११ वाजता सनराइज बार जवळ असलेल्या सर्व्हिस रोडवर एक रानमांजर वाहनाच्या धडकेने जखमी अवस्थेत पडली आहे अशी माहिती त्याचवेळेस तिथून जात असलेले सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ. चंद्रकात निंबार्ते यांनी ग्रीनफ्रेंडस नेचर क्लबचे निसर्गमित्र व सरीसृप संशोधक विवेक बावनकुळे यांना कळविली. विवेकने लगेच ग्रीनफ्रेंडसचे सर्पमित्र पंकज भिवगडे ,वनविभाग वाइल्ड लाईफ रेस्क्यूअर व ग्रीनफ्रेंड्स सर्पमित्र मयूर गायधने, मनीष बावनकुळे, आशिष कांबळे यांना कळविली व सर्वजण घटनास्थळी साहित्यानिशी पोहचले. मध्यरात्री पशुचिकित्सालय बंद असल्याने सर्वांनी निपचित पडलेल्या रानमांजराला मध्यरात्री उचलून डॉ. चंद्रकांत निंबार्ते यांनी त्यांच्या दवाखान्यात पशुवैद्यकीय चिकित्सक डॉ. गुणवंत भडके व डॉ. गिरेपुंजे यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार करून तिला स्थिर व आश्वस्त केले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ५ मे ला लाखनी पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय चिकित्सक डॉ.लता देशमुख यांना दाखविण्यात आले.

त्यांनी पुढील उपचार करून अजून दोन दिवस निरीक्षणाखाली ठेवण्याचा सल्ला दिला. त्यानुसार जखमी रानमांजराला विवेक बावनकुळे यांच्या घरी लाकडी पिंजऱ्यात देखरेखीखाली ठेवण्यात आले. या चार दिवसात विवेक बावनकुळे याने रानमांजर ची सुश्रुषा व काळजी घेतली. दरम्यान वनविभाग लाखनीचे वनरक्षक त्रिवेणी गायधने यांनी भेट देऊन संपूर्ण वस्तुस्थिती जाणून घेतली.

चार दिवसाने रानमांजर संपूर्णपणे सक्रीय झाल्यानंतर तिला ज्या भागात ती सापडली त्याच परिसरात सोडण्याचा निर्णय घेण्यात आला.सरतेशेवटी ९ मे च्या रात्री या रानमांजराची सुरक्षित सुटका करण्यात आली. सुरक्षित सुटका करतेवेळी ग्रीनफ्रेंडस सरीसृप संशोधक विवेक बावनकुळे, निसर्गमित्र पंकज भिवगडे,वनविभाग व ग्रीनफ्रेंडस वाइल्ड लाईफ रेस्क्यूअर मयूर गायधने,सामाजिक कार्यकर्ते डॉ. चंद्रकांत निंबार्ते,रवी पंचबुद्धे , आदित्य बांते,राज गिऱ्हेपुंजे यांनी उपस्थिती दर्शवून सुरक्षित सुटका करण्यास सहकार्य केले.

त्यावेळी रात्रीला सर्वांच्या चेहऱ्यावर एका मुक्या निरपराध जंगली जीवाला वाचविण्याचे अपार समाधान होते. अशाच प्रकारची एक घटना याच काळात रेंगेपार कोहळी या गावात एक चट्टेरी वन घुबड (इंग्रजी नाव: माटल्ड वूड आवूल ) जखमी अवस्थेत एका शेतातील विहिरीत आढळला . कदाचित भक्ष्य शोधण्यासाठी किंवा पाण्यासाठी तो विहिरीत आला असावा पण त्याच ठिकाणी ४ दिवसापासून जखमी अवस्थेत होता.

ग्रीनफेंड्सचा सर्पमित्र धनंजय कापगते याला याबद्दल माहिती दिल्यानंतर त्याने त्याला सुखरूप बाहेर काढले. त्याच्या पंखाला थोडा मार असल्याने तो उडू शकत नव्हता . त्याने चट्टेरी वनघुबडाला विवेक बावनकुळे यांचेकडे पुढील उपचारासाठी सोपविले. दोन दिवसाच्या उपचारानंतर त्याला सुद्धा नजिकच्या परिसरात निसर्गाच्या सानिध्यात सोडण्यात आले.

निसर्गमित्र पंकज भिवगडे याने सुद्धा गावात आढळणारा गव्हाणी घुबड (इंग्रजी नाव बार्नड आवुल) याला एका घरून सुरक्षितरित्या सोडवून निसर्गाच्या सानिध्यात मुक्त गेले. ग्रीनफ्रेंड्सच्या ह्या निसर्गमित्राच्या स्पृहणीय कामगिरीबद्दल लाखनी परिसरात अभिनंदन केले जात आहे.

# भंडारा-बालाघाट राष्ट्रीय महामार्गावर झाडाच्या फांद्या रस्त्यावर लोंबकळल्या

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा , दि.१२ मे :**वादळी वाऱ्यामुळे भंडारा-बालाघाट राष्ट्रीय महामार्गावर चुल्हाड गावाजवळील धर्मकाट्याजवळ मच्छेरा गावाशेजारी झाडाची मोठी फांदी तुटून रस्त्यावर लोंबकळत राहिली आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी ही फांदी दुचाकीस्वारांच्या दृष्टीस येत नसल्याने अनेक अपघात घडले आहेत. त्यामुळे वाहनधारकांचे जीव धोक्यात आले असून सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे पूर्णतः दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

वादळी वाऱ्यामुळे परिसरात घरांचे छप्पर उडाले, शेतात उभे असलेले धानाचे पीक आडवे झाले, विजेच्या तारा तुटल्या आणि अनेक झाडे रस्त्यावर कोसळली. विशेषतः राष्ट्रीय महामार्गावरील अर्धा रस्ता ही लोंबकळणारी फांदी व्यापून टाकत असल्याने वाहनचालकांसाठी मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

सध्या लग्नसराई सुरू असल्यामुळे रात्री उशिरापर्यंत प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारांचे प्रमाण वाढले आहे. अशावेळी रस्त्यावर दृष्टीआड असलेली फांदी गंभीर अपघातांना आमंत्रण देत आहे. फांदीजवळ तुटलेली दुचाकीची हेडलाइट्स, साइड मिरर आणि काचेचे तुकडे हे अपघातांचे स्पष्ट पुरावे आहेत.

### मुहूर्त कधी काढणार ?

भंडारा बालाघाट राष्ट्रीय मार्ग घोषणेला वर्ष निघून गेले आहेत. घोषणेचा आता विसर पडल्यागत अवस्था झाली आहे. अनेक वेळा महामार्गाचे मूल्यांकन करण्यात आले आहे. अनेकांचा अपघातात जीव गेला आहे, परंतु चौपदरीकरणचा मुहूर्त काढण्यात आला नाही. ही खरी शोकांतिका आहे.



‘गावाच्या शेजारी आणि हद्दीतून गेलेल्या महामागविर खेड्यात अनेक वेळा मुरूम घातला आहे. मार्गाच्या दुरूस्तीची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची असली तरी, सेवा देण्याची पाळी ग्रामपंचायतीवर आली आहे. बिनाखीच्या शेजारी मोठा खड्डा पडला आहे. लवकर महामार्गचे कामे सुरू केले पाहिजे.’

***देवेंद्र मेश्राम, अध्यक्ष सरपंच, संघटना तुमसर.***

महासागर भंडारा मंगळवार १३ मे २०२५ पान ६

# गावाचे नाव फलक खाताच्या ढिगाऱ्यात

## गोंडउमरी ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**

**गोंडउमरी , दि.१२ मे :** येथील गावाचे नाव फलक कोसळले असून गावाची ओळख फलका वरून केली जाते गेल्या अनेक दिवसापासून गोडउमरी

गावाचे नाव असलेला फलक लावण्यात आले होते .

ते फलक खाली पडलेले असुन येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंना गावाविषयी माहितीच कडून येत नाही हे गाव कोणते आहेत ,बाहेरगावींना दिसून येत नाही मात्र बाहेरगावी वाटसरूंना विचारल्याशिवाय पर्याय नाही हे फलक नव्याने लावण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे .



# संस्कारांची उजळणी घेत शिबिराची सांगता

## संस्काराच्या ३३ व्या निःशुल्क शिबिर




**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा,दि.१२मे :** संस्काराच्या ३३ व्या निःशुल्क शिबिराच्या शेवटच्या दिवशी, भारावलेल्या वातावरणात, मागील नऊ दिवसात, विविध उपक्रमातून तसेच अतिथींच्या मार्गदर्शनातून मिळालेल्या संस्कारांची उजळणी प्रश्नोत्तर चर्चेतून घेत, शिबिराची सांगता झाली.

सांगता कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार व संपादक प्रा. एच.एच. पारधी, निसर्गोपचार चिकीत्सक डॉ. विजय आयलवार, संस्कार शिबिराचा आदर्श विद्यार्थी दिवंगत डॉ. पराग डहाके यांचे आई-वडील, माजी शिबिर प्रमुख महेश रणदिवे तसेच जिल्ह्यातील गडकिल्ले मंदिर इत्यादी ऐतिहासिक वारसा अभ्यासणारे मोहम्मद सईद शेख लाभले. प्रा. पारधी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, निःशुल्क संस्कार शिबिराचे ३३ वर्षाचे सातत्य आणि कार्यकर्त्यांच्या सेवावृत्तीला मी सलाम करतो. सौ. मंगला डहाके म्हणाल्या, या शिबिरातून मिळणारे अनुभव जीवनाला बळ देणारे आहेत. डॉ. आयलवार यांनी शिबिरार्थ्यांच्या बक्षीसाकरिता पुस्तके प्रदान करीत, मी शिबिरातून शिकत गेलो असे सांगितले.

**अत्त दिपो भव**

शिबिराच्या परंपरेनुसार बुद्धपौर्णिमेचा कार्यक्रम घेतला जातो यावर्षी ज्येष्ठ शिबिर मार्गदर्शक हर्षल मेश्राम यांनी बुद्धवंदनेनंतर मार्गदर्शन करतांना 'अत्त दिपो भव' चा अर्थ, विविध उदाहरणे देत स्पष्ट केला. बुद्धविचारांचा भर कर्मकांडावर नसून, आचरणावर आहे, असे सांगितले. शिबिर संयोजक प्रा. वामन तुरिले यांनी अतिथींचे आभार मानले. याप्रसंगी सौ. पायल दिवटे यांनी बसवलेले नृत्य अठरा मुलामुलींनी सादर केले. 'भारतीय संविधान' या विषयावर निबंध स्पर्धा झाली.

**आगळीवेगळी स्पर्धा:**

शिबिर काळात मार्गदर्शकांनी सादर केलेले विचार, एका वाक्यात सादर करण्याची स्पर्धा घेतली गेली. चुकत सुधारत शिविरार्थ्यांनी शिबिर उद्घाटक रवीन्द्र सोनटक्के, रामबिलासजी सारडा, प्रा. नरेश आंबिलकर योगतज्ज्ञ डॉ. रमेश खोब्रागडे, योग शिक्षिका डॉ. गीता इलमे, डॉ. उल्हास फडके, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. आदित्य रोकडे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सौ. प्रतिमा रोकडे, आपत्ती निवारणचे अभिषेक नामदास, रेडक्रॉसचे डॉ. अशोक ब्राहमणकर, डॉ. नितीन तुरस्कर, डॉ. चंद्रमोहन गुप्ता,

सामाजिक वनीकरणाचे लक्ष्मण आवारे, प्रवीण नाईक, सानिया सरटकर यांच्या भाषणाचे सारांशरूपाने एकेक वाक्य हसत खेळत सांगितले.

बक्षीसांकरिता कृतिगीते, मनाचे श्लोक पाठांतर, कथाकथन, नृत्याविष्कार, प्रथमोपचार प्रात्याक्षिके, निबंधलेखन, शिबिरातील वर्तन, शिबिरव्यवस्थापन हे विषय होते. त्यानुसार प्रत्येकाला प्रमाणपत्र व बक्षीस मिळाले.

**श्रद्धांजली :**

संस्कार शिबिर प्रारंभ करणाऱ्या मंडळीत सिंहाचा वाटा असलेले डॉ. सुधाकरराव जोशी यांच्या निधनाची वार्ता, ३३ व्या शिबिराच्या सांगता दिनी शिबिरात पोहोचली. त्यानिमित्त जोशीसरांना शिबिराकडून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**विचार प्रवर्तक मनोगत :**

शिबिरार्थी नीर वाघमारे म्हणाला, या आनंदोत्सवात दडपण न येता, मराठीत बोलता येते (मिडियम बद्दलचा सूर) प्रांजली वंजारी म्हणाली पुढील वर्षातील २ मे २०२६ च्या संस्कार शिबिराची संधी मी सोडणार नाही (आवडीचा सूर).'हा देश माझा, याचे भान जरासे राहू द्या रे' या कृतिगीतानंतर, शिबिराची भारावलेल्या वातावरणात सांगता झाली.

# वाघाने केली गायची शिकार

## मोहगाव खदान परिसरात वाघाची दहशत कायम



**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा, दि.१२ :** तुमसर तालुक्यातील मोहगाव खदान परिसरात जंगलव्याप्त गावात वाघाचा धुमाकूळ सूरूच असून दहशत कायम आहे.

दि. ११ मे रोजी गावालगतच्या जंगलात चराईसाठी गेलेल्या किसन पटले नामक शेतकरी पशुपालकाच्या गायीवर वाघाने झडप घालून शिकार केली. सदर घटना आज दुपारी ३.३० वाजतादरम्यान उघडकीस आली.

मोहगाव खदान येथील किसन पटले व इतरही शेतकरी पशुपालकांची पाळीव जनावरे गावालगतच्या पाचरा-इंजेरिया वनविभागाच्या जंगल परिसरात गेल्या होत्या. जनावरे चरत असतांना जंगलात दबा धरुन असलेल्या वाघाने गायीवर झडप घालून शिकार केली. या पूर्वी सुद्धा वाघाने हल्ला चढवून अनेक पाळीव जनावरांचा बळी घेतला आहे.

ज्या ठिकाणी गायीची शिकार केली त्या ठिकाणी काही दिवसांपूर्वी मृतावस्थेत आढळून आलेल्या वाघाला अग्नि देऊन जाळलेले होते. या घटनेमुळे पशुपालक शेतकऱ्यांसह नागरिकांत भितीचे वातावरण निर्माण होऊन पशुपालकाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.

नुकसानग्रस्त पशुपालाकाला वनविभागाने आर्थिक मदत देऊन तात्काळ वाघाचा बंदोबस्त करावा, अशी मागणी गावकऱ्यांसह शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# बालसुसंस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांना सर्वांगीण संस्कार

## *९८ मुला मुलींचा सहभाग * वारकरी मंडळीने घेतला पुढाकार




**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी , ता.१२ :** धार्मिक , आध्यात्मिक , सामाजिक व नैतिक मूल्यशिक्षणाची रुजवणूक करण्याच्या उद्देशाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांची कास धरत त्यांचे विचार,ग्रामगिता घराघरात पोहोचविण्यासाठी झटणाऱ्या गुरुदेव भक्तांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील हिवरा येथे ९८ मुला मुलीवर सर्वांगीन सु-संस्कार घडविण्याचे काम शिबिराच्या माध्यमातून होत आहे.

मुलांमध्ये सेवा, शिस्त, स्वाध्याय, संयम व सुसंस्कार निर्माण व्हावे या उद्देशाने वारकरी परिवार व ग्रामस्थांच्या वतीने हिवरा येथे (दि. २ मे) पासून सुसंस्कार शिबिराला सुरुवात झाली आहे. या शिबिरामध्ये स्थानिक व आजूबाजूच्या गावांमधून एकूण ९८ मुले व मुली सहभागी होऊन मूल्य शिक्षणाचे धडे घेत आहेत. विद्यार्थ्यांना शिबिरामध्ये दररोज हरिपाठ, सामुदायिक प्रार्थना, बौद्धिक, लाटीकाटी, दानपट्टा,लेझीम, संगीत, कुस्ती, तलवारबाजी,मनोरे चे धडे दिले जातात. सहभागी विद्यार्थ्यांना सकाळी चार वाजता उठून स्वतःची कामे स्वतः कशी करावी याबाबत विशेष मार्गदर्शन केले जाते. तसेच फराळ, दूध, फळे तसेच दोन वेळचे सात्विक भोजन सुद्धा विद्यार्थ्यांना दिले जाते. दररोज विद्यार्थ्यांना व्यायामाची सवय लावून शारीरिक व मानसिक सुदृढ जीवनाची शैली शिकवल्या जाते. शिबिरार्थ्यांना संगीत कला अवगत होण्यासाठी दररोज राष्ट्रसंताचे भजन व इतर कोणत्याही संतांचे अभंग या-च्या स्पर्धा घेऊन सादर केले जातात. या शिबिराने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आणि प्रामुख्याने गावकरी सुद्धा या शिबिराला मदत करीत आहेत.

शिबिरार्थांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यासाठी अहिल्याताई गोखले-केंद्रीय प्रचारिका गुरुकुंज मोझरी, मनोहर वडीचार-ग्रामगीताचार्य, शालूताई कापसे, गौरीशंकर नागफासे, शेंडे महाराज, चंद्रशेखर आसटकर महाराज, नक्षीने, कन्नाके हे प्रामुख्याने उपस्थित असतात.

***'शिबिराचा ९ वा दिवस'***

ग्रामगीता स्फूर्ती सेवाश्रम तीर्थक्षेत्र हिवरा येथे (दि.२मे) पासून सुरू असलेल्या बाल सुसंस्कार शिबिरात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आहे.

शिबिराच्या ९ व्या दिवशी सकाळी ७ वा . सामुदायिक प्रार्थनेने सुरुवात करण्यात आली. याचे सूत्रसंचालन सर्व महिला शिबिरार्थींनी केले. प्रार्थनेची सूचना वीरा मते हिने केले. कनक गोन्नाडे यांनी भजन म्हटले. प्रार्थनेवर मार्गदर्शन स्वराज्ञा मते यांनी केले. तर आसन पूजा नायरा रोकडे यांनी केले.

***'सु-संस्काराचे धडे'***

मोबाईल मध्ये बालपण हरपलेल्या मुलांना सुसंस्काराचे धडे देण्याचे काम या शिबिरा मार्फत होत आहे. घरापासून दूर असणारी ही मुले या शिबिरात अगदी शिस्त आणि सेवाभावाने चांगल्या गोष्टी आत्मसात करण्यासाठी उत्साही आहेत. मुलांमध्ये सर्वधर्म समभाव, राष्ट्रीय एकात्मता, थोर पुरुषांचे आदर्श, व्यक्तिमत्व विकास, सामाजिक कर्तव्याची जाणीव, अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांना धडे शिकविले जात आहे.

***'व्यक्तिमत्व विकासाची संधी'***

विद्यार्थ्यांना वारकरी बाल सुसंस्कार शिबिरातून व्यक्तिमत्व विकासाची संधी उपलब्ध झाली आहे. अभंग, किर्तन,भजन,कुस्ती, कबड्डी, दांडपट्टा, तलवारबाजी यासारखे खेळ, चिंतन मनन व ध्यानाची सवय व्यसनमुक्ती असे नैतिक मूल्यांचे संस्कार या शिबिरातून विद्यार्थ्यांना दिले जात आहे .

# पक्षवाढीसाठी सर्वांनी कामाला लागावे - मा.आ.चरण वाघमारे

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची जिल्हा बैठक संपन्न



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा , दि.१२ :** भंडारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची जिल्हा कार्यकारिणीची बैठक विश्रामगृह भंडारा येथे जिल्हाध्यक्ष माजी आमदार चरण वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. काही दिवसापूर्वी पाकीस्तान समर्थीत आतंकवाद्यांकडून पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्लयात २८ भारतीय नागरिक ठार झाले त्या बदल्यात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थिती बाबत आदरणीय राष्ट्रवादी काँग्रेस (श.प)पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार यांनी सरकारच्या भूमिकेचे समर्थन करीत आपली भूमिका स्पष्ट केली त्याबाबद भंडारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने या बैठकीत एकमताने ठराव पारित करून शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्याचबरोबर येणाऱ्या काळात भंडारा जिल्ह्यातील साकोली, पवनी, भंडारा आणि तुमसर अशा चार स्थानिक स्वराज्य संस्था नगरपरिषदेच्या निवडणुका तोंडावर असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडूण आणण्यासाठी राज्य स्तरावरील पदाधिकारी,जिल्हा पदाधिकारी, आणि तालुका पदाधिकारी यांनी पक्षाचे धोरण सर्वसामान्य जनमानसात रुजवून पक्षसंगठन वाढीसाठी प्रयत्न करावे. असे आवाहन रा काँ (श प) पक्षाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार चरण वाघमारे यांनी केले आहे. बैठकीचे संचालन जिल्हा सरचिटणीस विनोदजी वटी यांनी तर आभारप्रदर्शन दुसरे सरचिटणीस मुनेश्वरजी काटेखाये यांनी केले.

याप्रसंगी सरचिटणीस गौरव नवरखेले, महिला जिल्हाध्यक्ष सौ राणीताई ढेंगे, युवक आघाडी जिल्हाध्यक्ष नितीन मारवाडे अध्यात्मिक आघाडी जिल्हाध्यक्ष हरिश्चंद्र धकाते, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख हरिश्चंद्र बंधाटे ,नियोजन प्रमुख बालचंद पाटील ,जिल्हा सचिव डॉ जितेंद्र तुरकर, अजय मेश्राम, मेहताबशिंग ठाकूर प्रदेश कार्यकारिणी सदस्य विजयजी नवखरे तसेच चंद्रशेखर भिवगडे,योगेश सेलोकर, कुणाल पवार, मधुकर चौधरी, सुधीर गिरी-पुंजे, विजयजी जाधव, अनिलजी सार्वे, नागफासे गुरुजी, रत्नाकर थाटकर, अरविंद राऊत, रवी येळणे,हेमंत मलेवार, विद्या हरिश्चंद्र धकाते, नीलिमा रामटेके, शाहिना खान, घनशाम वंजारी,महेश रहांगडाले, ईश्वर तांडेकर तसेच ईतरही पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सौ सुमन उपासे यांचे निधन



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि.१२ मे :** पंचशील वार्ड येथील रहिवासी सौ. सुमन ताराचंदजी उपासे वय ७८ वर्ष यांचे आज सकाळी आकस्मिक निधन झाले.

त्यांच्या कुटुंबात चार मुलं, सुन, मुलगी, नातवंड असं कुटुंब आहे. गणेश ताराचंद उपासे यांच्या त्या मातोश्री आहेत. त्यांची अंत्यष्टी दुपारी चार वाजता दुर्गाबाई डोह येथे करण्यात आली.

# जांब येथे लोकसभागातून प्रकल्पाच्या जनजागृती करीता मशाल फेरी व शिवार फेरीचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**जांब (लोहारा) :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा ०२ मध्ये मौजा जांब या गावाची निवड करण्यात आली. दिनांक ०५/०५/२०२५ ते ११/०५/२०२५ दरम्यान गावात सूक्ष्म नियोजन प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने गावचा हवामान अनुकूल आराखडा लोकसहभागातून तयार करण्याची सुरवात दिनांक ०५/०५/२०२५ पासून सायंकाळी गावात ग्राम.कृषी विकास समितीचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली मशालफेरी काढून करण्यात आली. दिनांक ०६/०५/२०२५ रोजी शालेय विद्यार्थ्यांसोबत प्रभात फेरी काढून गावात प्रकल्पाची जनजागृती करण्यात आली.

सोबतच लोक सहभागातून गाव संसाधन नकाशा आणि गाव नकाशा याचे अवलोकन करण्यात आले. प्रभात फेरी झाल्या नंतर दुपारच्या सत्रामध्ये कृषी विषयक महत्त्वाच्या बाबी व हवामान अनुकुलतेवर लक्ष्यगट चर्चा गावातील शेतकरी आणि बचत गटातील महिला यांच्या



समवेत करण्यात आली.

सदर सभेचे अध्यक्ष स्थान ग्राम कृषी विकास समितीचे अध्यक्ष तथा सरपंच वसुंधरा किरण अतकरी यांनी भूषवले, प्रकल्पा बद्दलची संपूर्ण माहिती व लक्षगट चर्चे मध्ये आलेले विषय याबद्दल माहिती कृषी विभागाचे कृषीसेवक अक्षय अनिल बागडे यांनी गावकऱ्यांना दिली.

सभेमध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक .किरण अतकरी, ग्राम. सदस्या, स्मिता साठवणे, अनिल बडवाईक, मोहित बांते,माजी सरपंच .चंद्रसेन उताणे,युवा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष सुखदेव लांजेवार, .भूपेश पवार, आशाताई .मंदा मात्रे, गीता शेंडे, आरती सम्रीत,.सुलभा उके आणि कृषीताई . प्रियतमा नागफासे, बचत गटातील महिला आणि गावातील शेतकरी प्रामुख्याने उपस्थित होते.


# ई-निविदा सुचना

## महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग

**कार्यकारी अभियंता, विदर्भ जल विद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा यांचे कार्यालय**

**ई-मेल पत्ता: eevhelidb@rediffmail.com दूरध्वनी क्र. (०७१८४) २५०८९५**

**ई- निविदा सुचना क्र. का.अ./विजविवउसिविभं/ पंपगृह डीटीसी/ ०२/ २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग भंडारा, हे सक्षम व अनुभवी विद्युत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येवून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यलयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग भंडारा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असलेस वरील वेवसाईटवर कळविण्यात येईल.

**कामाचे नाव - गोसीखुर्द पूर नियंत्रण पंपगृह ता.जि. भंडारा जवळ ११ के. व्ही. वाहिनी व ६३ के. व्ही. ए. रोहित्र पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वितीकरणाचे काम.**

**जिल्हा: भंडारा.**

**निविदेची अंदाजित किंमत रूपये:- ३७,१५,३४३/-**

**ई- निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक १३/०५/२०२५ ते दिनांक २०/०५/२०२५**

**ई - निविदा उघडणे - दिनांक २२/०५/२०२५**

**खालील संकेतस्थळावर ई निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

**१. http://mahatenders.gov.in**

**(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असलेस वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)**

**२. कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग भंडारा, कार्यालयातील सुचना फलक**

जा.क्र. काअ/विजविवठसिविर्भ/निली / ४६४/२०२५
कार्यकारी अभियंता,
विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन
विभाग भंडारा विभाग, भंडारा यांचे कार्यालय
दिनांक - ०२/०५/२०२५
**( जिमाकाभं/ जाहिरात क्रमांक ९ )**

**कार्यकारी अभियंता,**
**विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग**
**भंडारा**


RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा **मालक, मुद्रक, प्रकाशक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक**- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८-९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

